N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापूर ग्रामीण **P.S.(ठाणे):** करमाळा **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1107 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/12/2021 15:09 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 02/12/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/12/2021
**Time From (वेळेपासून):** 12:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/12/2021 **Time (वेळ):** 15:01 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 027 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/12/2021 15:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** 2 करमाळा पोलिस ठाणे येथील अंभ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सौ. संगिता मच्छिंद्र काळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | भाळवणी, ,करमाळा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | भाळवणी, ,करमाळा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 पोलीस नाईक1654 गोरख आप्पा | | | 1. 72 बंगला करमाळा ,करमाळा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 28.12.2021मी सौ. संगिता मच्छिंद्र काळे, वय 35 वर्षे, व्यवसाय- गृहिणी, रा. भाळवणी, ता. करमाळा, जि. सोलापूर समक्ष फिर्यादी जबाब देते की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास असून माझे पती शेतावर मोलमजुरी करतात. मी एका बागमालकाकडे रोजगारावर नोकरीस असून त्यावर आमचा उदरनिर्वाह चालतो. दि. 17.11.2021 रोजी सायंकाळी 05.30 ते 6.00 वा. च्या दरम्यान माझे दीर तुळशिराम काळे व त्याची बायको वंदना त्यांचा मुलगा राजेंद्र वगैरे 6 जणांनी मला शिवीगाळ करुन मारहाण केली व मला लज्जा वाटेल असे कृत्य करुन माझ्या अंगावर आले. त्यामुळे मी करमाळा पोलीस ठाणे येथे त्यांच्याविरुध्द तक्रार देण्यासाठी गेले होते. त्या ठिकाणी कर्तव्यास असलेले पोलीस ढाकणे साहेब यांनी माझी तक्रार ऐकून घेतली व त्यांनी माझी तक्रार दाखल करण्यासाठी माझ्याकडे 5000/- रु. मागणी केली. त्यावर माझ्यावर अत्याचार झाला असून मी एवढे पैसे देवू शकत नाही असे सांगून सोलापूर पोलीस अधीक्षक कार्यालय येथे माझी तक्रार देण्याकरिता आले होते. त्यानंतर एस.पी. ग्रामीण पोलीस ऑफिस कार्यालय येथे माझा तक्रारी अर्ज दिला आणि एस. पी. ऑफिस सोलापूर ग्रामीण येथे उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांना करमाळा पोलीस ठाणे येथे घडलेली हकीकत सांगुन माझी तक्रार नोंदविली नसल्याबाबत कळविले. त्यावेळी मला एस.पी. ऑफिस येथील अधिकारी यांनी करमाळा पोलीस ठाणे येथे जावून भेटा असे सांगितले. त्यामुळे मी पुन्हा करमाळा पोलीस ठाणे येथे गेले असता तेथे पोलीस ढाकणे साहेब मला भेटले व त्यांनी तु माझ्याविरुध्द सोलापूर येथे तक्रार दिली. आता तर तू मला 25000/- रु. दे तरच मी तुझी तक्रार दाखल करतो असे म्हणून माझ्याकडे 25000/- रु. लाचेची मागणी केली. माझा व पोलीस ढाकणे साहेब यांचा कोणताही पैशाच्या देवाणघेवाणीचा व्यवहार प्रलंबित नसल्याने अगर माझा व पोलीस ढाकणे साहेब यांचा कोणताही भांडणतंटा नसल्याने तसेच माझी तक्रार दाखल करण्याकरिता पोलीस ढाकणे साहेब यांनी माझ्याकडे मागणी केलेली रक्कम ही कोणतीही शासकीय फि नसून लाच मागणी आहे याची खात्री झाल्याने मी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयास दि.01.12.2021 रोजी समक्ष माझी तक्रार सांगितली. अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. कोळी यांनी माझी तक्रार ऐकुन त्यांनी मला दिनांक 02.12.2021 रोजी करमाळा गावाचे अलिकडे कमलाई देवीचा माळ येथे येवून थांबावयास सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 02.12.2021 रोजी 13.00 वा. करमाळा गावाचे अंदाजे 2 किमी अलिकडे कमलाई देवीचा माळ येथे येवून थांबले. त्यावेळेस पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी हे त्यांचे स्टाफसह तेथे शासकीय वाहनाने आले. पोनि कोळी यांनी मला वाहनामध्ये बोलावून घेवून त्यांची व तेथे उपलब्ध असलेले तहसिल कार्यालय, मोहोळ या कार्यालयातील शासकीय पंच श्री उध्दव कांबळे व श्री ऋषिकेश पुजारी यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता, मी पोलीस ढाकणे यांचेविरूध्दची वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. मला लिहीता वाचता येत नसल्याने पोनि कोळी यांचे सांगणेवरुन पंचासमक्ष माझ्या सांगणेवरुन पंच क्र.1 कांबळे यांनी सदरची तक्रार लिहुन दिली. सदरची लेखी तक्रार

पोनि कोळी व दोन्ही पंचानी वाचून त्यावर सह्या केल्या. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करित असल्याचे आम्हास सांगितले. त्यासाठी आम्हास व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला व माझ्या सोबत पंच नं 1 कांबळे यांना सुचना दिल्या की, आम्ही करमाळा पोलीस ठाणे येथे जावून तेथे पोलीस ढाकणे यांची भेट घेवून त्यांच्याशी माझे कामाबाबत चर्चा करावी. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्यावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे व त्वरीत पथक थांबल्या ठिकाणी परत यावे अशा सविस्तर सुचना मला व पंच नं.1 कांबळे यांना दिल्या. त्यानंतर मला व पंच नं.1 कांबळे यांना करमाळा पोलीस ठाणे येथे पाठविणेअगोदर सापळा पथकातील महिला पोलीस नाईक अर्चना स्वामी यांनी व्हईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या गळ्यात अडकावून माझे पतीने आणलेल्या मोटार सायकलवरुन आम्हास पाठवले. त्यावरुन मी, पंच नं 1 कांबळे यांच्यासह पोलीस ढाकणे यांची करमाळा पोलीस ठाणे येथे भेट घेवून माझ्या कामाबाबत चर्चा करत असताना, पोलीस ढाकणे यांनी मी दिलेल्या तक्रार अर्जावरुन गुन्हा नोंद करुन घेण्यासाठी पोलीस ढाकणे यांनी माझ्याकडे पंचवीस हजार रुपये मागणी केली व मोठा गुन्हाय, तुला जेलमधी दोन महिनं बसावं लागंल.. असे बोलुन पैसे दे आणि तुझी तु निघुन जा असे बोलले. त्यावर मी म्हणाले की, आता माझ्याकडे तेवढे पैसे नाहीत. मी 10 हजार घेवून आल्याचे सांगितले त्यावर पोलीस ढाकणे यांनी आणखी 10 ॲडजेस्ट करुन 20 हजार घेवून येण्यास सांगितले. त्यावर मी ढाकणे यांना आता एवढे नाही होत असे सांगितले असता, पोलीस ढाकणे यांनी मला मी खुप मोठा गुन्हा केला आहे असे सांगुन माझ्याकडे 25,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अती 20,000/- रुपयेची मागणी केली. सदर लाचेची रक्कम थोडया वेळात करमाळा पोलीस ठाणेस घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर दिलेल्या सुचनेप्रमाणे मी व पंच नं.1 कांबळे असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि कोळी यांच्या सांगण्यावरुन महिला पोना स्वामी यांनी माझ्या गळ्यातील रेकार्डर काढून पंच नं.1 कांबळे व मला हकीकत विचारुन घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्तप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि कोळी, व पंचानी रेकर्डरमध्ये माझ्यात आणि पोलीस ढाकणे यांच्यात झालेले संभाषण त्यांच्याकडील लपटपला रेकर्डर जोडून ऐकले. त्यामध्ये पोलीस ढाकणे यांनी 20,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले. परतु माझ्याकडे 20,000/- रुपये नसल्याने पोनि कोळी यांच्या सुचनेवरून मी पोलीस ढाकणे यांना देण्यासाठी माझ्याकडे असलेले 10,000/- रूपये हजर केले. त्यात 2000/- रूपये दराच्या 03 नोटा व 500/- रुपये दराच्या 10 नोटा होत्या. मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पोनि कोळी यांनी एका कोऱ्या कागदावर लिहुन घेवून त्याचेवर पोनि कोळी व दोन्ही पंचानी सह्या केल्या. त्यानंतर पोलीसांनी त्यांच्यासोबत आणलेल्या पांढऱ्या रंगाच्या पावडरची माहिती देताना, सदरची पावडर ही ज्या वस्तुला लागेल ती वस्तु अंधारात चमकत असल्याचे, मात्र प्रकाशात सदरची पावडर दिसत नसल्याचे सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना सदरची पावडर लावुन त्याच डब्बीत असलेल्या कापराने वाहनात तात्पुरता अंधार करुन नोटा चमकत असल्याचे दाखविले. त्यानंतर पोनि कोळी यांनी सापळा पथकाशी व पंचांशी चर्चा करुन यातील पोलीस ढाकणे यांच्यावर करमाळा पोलीस ठाणे व परिसरात लाचेचा सापळा आयोजीत केला. त्यानध्ये मी व पंच नं 1 कांबळे असे दोघेजण मोटार सायकलवरुन व उर्वरीत सापळा पथक शासकीय वाहनामधून करमाळा पोलीस ठाणेजवळ आलो. तेथे मी, पंच नं 1 कांबळे यांच्यासह पोलीस ढाकणे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी करमाळा पोलीस ठाणे येथे गेले असता पोलीस ढाकणे साहेब हे करमाळा पोलीस ठाणे येथे न भेटल्याने त्यांचा मोबाईल क्र.9923702042 वर फोन लावला असता पोलीस ढाकणे यांनी थोड्या वेळात येतो असे सांगितले. त्यानंतर थोडयावेळाने पोलीस ढाकणे साहेब हे करमाळा पोलीस ठाणे येथे मी थांबलेल्या ठिकाणी गाडीवर आले व लाचेच्या रकमेपैकी पहिला हमा 10,000/- रू. न स्वीकारता मला उद्या येण्यास सांगुन गाडीवरुन निघुन गेले. त्यामुळे पोलीस ढाकणे साहेब यांनी माझ्याकडून पैसे न घेतल्याने मी परत कमलाई देवीचा माळ या ठिकाणी परत आले. त्यानंतर माझ्या विनंतीवरुन सदरची सापळा कारवाई दि.03.12.2021 रोजी करण्याचे पोनि कोळी यांनी सर्वानुमते ठरविले तशा मला व पंचाना सुचना देण्यात आल्या.त्यानंतर दि. 03/12/2021 रोजी मी 13.41 वा चे सुमारास पोनि कोळी यांनी पुन्हा पंचासोबत मला करमाळा पोलीस ठाणे येथे पोलीस ढाकणे साहेब यांची भेट घेण्याकरिता पाठविले असता, त्या ठिकाणी पोलीस ढाकणे साहेब यांची भेट न झाल्याने त्यांचा मोबाईल क्र. 9923702042 वर फोन लावला असता त्यांचा मोबाईल स्विच ऑफ लागत होता. त्यानंतर त्यांनी आजतागायत माझ्याकडे पैशाची मागणी केलेली नाही, त्याचप्रमाणे ते माझ्या तक्रारीप्रमाणे गुन्हा नोंद करणार नाहीत तसेच माझ्याकडून पैसे स्विकारणार नाही असे मला काही लोकांकडून समजले आहे. तसेच गुन्हा नोद करण्याकरिता माझ्याकडे लाचेची मागणी करणारे पोलीस ढाकणे हे पोलीस नाईक/1654 गोरख आप्पा ढाकणे, ने. करमाळा पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण असे असल्याचे मला समजले आहे.तरी पोलीस ढाकणे साहेब यांनी दि. 02.12.2021 रोजी 12.30 ते 18.00 वा. च्या दरम्यान आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन, माझ्या तक्रारी अर्जावरुन गुन्हा दाखल करणेकामी प्रथम 25,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 20,000/- रुपयेची मागणी केली. त्यातील पहिला हमा म्हणुन 10,000/- रु. लाच स्विकारण्याचे मान्य केले. पोलीस ढाकणे यांनी बेकायदेशीरीत्या व्यक्तीगत सांपत्तीक फायदा मिळवण्याचा प्रयत्न करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी पोलीस नाईक/1654 गोरख आप्पा ढाकणे, ने. करमाळा पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये कायदेशिर फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा लपटपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर तो माझे पती मच्छिंद्र काळे यांनी मला वाचून दाखविला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. हा जबाब दिला स.ता.म समक्ष (चंद्रकांत कोळी) पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SURYKANT DEVRAO KOKANE(I (Inspector)) / POBN65805 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

(इ. लि. स. सौ संगीता काळे यांचे डावे हाताचा असे)

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

अभिषेक सोपान काळे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SURYKANT DEV[illegible]KANE

**Rank**(पद): I (Inspector

**No.**(सं.): POBN65805